महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**Maharashtra Public Service Commission**

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# नगर रचनाकार, गट - अ, (राजपत्रित) नगर विकास विभाग

**धारिका क्रमांक :११८३/९९९८/पंधरा**

## जाहिरात क्रमांक : १७/२०१८

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागांतर्गत **नगर रचनाकार, गट - अ, (राजपत्रित) नगर विकास विभाग, या पदाच्या २६ जागांसाठी ऑनलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पुर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

**२ . उपलब्ध पदसंख्या :- २४+२▼**

| जात प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एकूण मागासवर्गीय | अमागास | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५+१▼ | १ | १ | -- | -- | -- | १▼ | ४ | ११+२▼ | १३ | २४+२▼ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | २+१▼ | -- | १ | -- | -- | -- | १▼ | १ | ४+२▼ | ४ | ८+२▼ |
| **अ)महिला**(३०%) | २* | १* | -- | -- | -- | -- | -- | २* | ५* | ७ * | १२ |
| **ब)खेळाडू**(५%) | १☑ | -- | -- | -- | -- | -- | -- | १☑ | २☑ | २☑ | ४ |
| * उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित, ▼ अनुशेषाची पदे, ☑ उपलब्ध असल्यास खेळाडूंसाठी आरक्षित | | | | | | | | | | | |

**२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

२.२ शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/सुधार-३, दिनांक १७ मार्च २०११ च्या अनुषंगाने (अ) श्रवणशक्तीतील दोष (Hearing Impairment) (ब) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) (शासन निर्णयात नमूद उपकरणासह कार्यरत राहण्याची क्षमता आवश्यक) प्रवर्गाचे विकलांग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत. तथापि विकलांग वर्गवारीसाठी पद आरक्षित नाही.

**२.३** शासन आदेशानुसार वि.जा.(अ), वर्गवारीसाठी आरक्षित असलेले पद आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या अंतर्गत परिवर्तनीयतेच्या धोरणानुसार सदर पदासाठी भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज. (ड) या पैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

**२.४** महिला आरक्षण व त्या संदर्भातील नॉन क्रिमीलेयर (NCL) तसेच मागासवर्गीय आरक्षण व त्या संदर्भातील नॉन क्रिमीलेयर (NCL) प्रमाणपत्राचा नमुना आणि इतर अटी व शर्तीबाबत उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील "सरळसेवा भरती " विभागातील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांचे" काळजीपुर्वक अवलोकन करुनच त्याचे अनुपालन करावे.

**३. वेतनश्रेणी : पे बॅण्ड रु. १५६००-३९१००/-, ग्रेड पे रु. ५४००/- अधिक इतर भत्ते -**

**४. पात्रता विषयक अटी**

४.१ उमेदवार भारतीय नागरीक असावा.

**४.२ वय - दिनांक १ जुलै, २०१८** रोजी अमागास उमेदवारांकरिता ३८ वर्षे व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.३** शासन सेवेत पुर्णवेळ कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. तथापि शासनसेवेतील मागासवर्गीय उमेदवारांचे वयोमर्यादेतील सवलती ऐवजी, शासन कर्मचारी म्हणून ५ वर्षाची एकच सवलत उपलब्ध राहील.

**४.४ शैक्षणिक अर्हता -** The candidates must

Possess a Degree in Civil Engineering or Civil and Rural Engineering or Urban and Rural Engineering or Architecture or Construction Technology or Urban Planning of a Recognised University or equivalent qualification.

**AND THEREAFTER**

**४.५ अनुभव -** Have experience of not less than three years in Town Planning or Town Planning and Valuation of Lands and Buildings.

**टीप — १)** विहित केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर, शासकीय संस्था अथवा निमशासकीय संस्था अथवा शासनाचे अंगीकृत उपक्रम अथवा शासन नियंत्रित संस्था अथवा कंपनी अधिनियमांतर्गत नोंदणीकृत संस्था किंवा शासनाच्या कोणत्याही कायद्यान्वये नोंदणीकृत असलेली संस्था/खासगी क्षेत्र यांमध्ये नगर रचना अथवा नगर रचना व जमिन, इमारतीचे मूल्यांकन या विषयातील ३ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. खाजगी क्षेत्रात काम करण्याचा अनुभव असणा-या उमेदवारांनी वर नमूद विषयांमध्ये अनुभव असलेले प्रमाणपत्र सादर करतांना त्यामध्ये त्याने वर नमूद विषयामध्ये प्रत्यक्षात हाताळलेल्या कामांचा विनिर्दिष्टपणे उल्लेख करणे आवश्यक रहील.

२) मुलाखतीच्यावेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये ४.५ मधील कर्तव्ये व जबाबदा-यांचे स्वरुप असलेला अनुभव नमूद केलेला असणे आवश्यक आहे.

**४.७** खेळाडूचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील खेळाडूसाठी राखीव पदाकरिता दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे गट - अ पदासाठी खेळाडू कोट्यातील पदासाठी पात्र असल्याचे मुलाखतीच्या तारखेपुर्वी क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. मुलाख़तीच्या दिवशी खेळाडू कोट्यातून गट - अ पदासाठी पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्या उमेदवाराचा दावा आयोग ग्राह्य धरणार नाही. खेळाडूकरीता आरक्षित पदासाठी खेळाडू उमेदवार म्हणून दावा करु इछिणा-या उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनामधील परी. ४.५ ची आवश्यक ती नोंद घ्यावी.

**४.८** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

**५. परिविक्षाधीन कालावधी २ वर्षे राहील.**

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष याच्याआधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्कनिवडीची सर्वसाधारण प्रक्रिया परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**८. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**९.** शुल्क :

**९.१.** अमागास उमेदवारांकरिता - **रु. ५२४/-** २) मागासवर्गीय उमेदवारांकरिता - **रु. ३२४/-**

**९.२** ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा किंवा पात्रतेच्या कोणत्याही निकषांमध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे, अशा उमेदवारांची अमागास सर्वसाधारण वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**१०.** अर्ज करण्याची पध्दत —

**१०.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२** पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज https://.mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ६ मार्च, २०१८ ते दिनांक २६ मार्च, २०१८** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://.mahampsc.mahaonline.gov.in

तसेच www. mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१०.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएफसी (नागरी सुविधा केंद्र)

**१०.६** https://.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएफसी ची सूची उपलब्ध आहे.

**१०.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील.

(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाइन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांका नंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-३/ १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.**

**१४. मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**१५.** चाळणी परीक्षा झाल्यास त्या परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

**१६. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक किंवा संपर्क साधने आणण्यास, बाळगण्यास वा वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**१७. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१८. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २७ मार्च, २०१८ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई** **राजन बा. खोत**

**दिनांक :- ६ मार्च, २०१८** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**